# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड नाशिक–रोड ,नाशिक

☎ : 2461479, Fax : 2455301 ई–मेल:–ronashik.dte@gmail.com.

Website :-www.dtensk.org

जा.क्र.तंशि/विकाना/ 31 दिनांक :- ०६/०१/२०११

प्रति,

सर्व प्राचार्य/संचालक,

शासकीय,अशासकीय अनुदानित,विनाअनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या पदवी संस्था,

नाशिक विभाग.

विषय :- पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमसाठी ई-लर्नींग सुविधा उपलब्ध करुन देण्या बाबत ....

संदर्भ:- १. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१०/ २०५/१०/मशि - ४ दिनांक ९ जुले २०१०.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन पदवी संस्थांनमध्ये पर्यावरण शास्त्र हा अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रम संदर्भिय शासननिर्णयात नमुद केल्याप्रमाणे ई-लर्निंग सुविधेव्दारे उपलब्ध करुन घेण्याबाबत निर्देशित केलेले आहे. सदर सुविधा लॉयकॉस टेक्नोलॉजी प्राव्हेट लिमिटेड वाशी नवी मुंबई यांचे कडुन उपलब्ध करुन घेण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्या संदर्भिय शासननिर्णयाचे अवलोकन करुन त्वरीत कार्यवीही करावी.

(दि. रा.नंदनवार)

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक.

सहपत्र:- संदर्भिय शासननिर्णयाची प्रत

पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमासाठी
ई-लर्निंग सुविधा उपलब्ध करुन
देणेबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१०/(२०५/१०)/मशि-४
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक ९ जुलै, २०१०

संदर्भ :- शासन आदेश क्र.एनजीसी २००९/(३९/०९)/मशि-३,
दि.२९ ऑगस्ट, २००९

**प्रस्तावना :**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी पर्यावरणशास्त्र हा अभ्यासक्रम देशातील सर्व विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमासाठी अनिवार्य विषय म्हणून लागू करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रम अनिवार्य केला असला तरी सदर विषयासाठी अनुदान तसेच नवीन पदे अनुज्ञेय केलेली नाहीत. तथापि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने तयार केलेल्या अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांना शिकविणे आवश्यक असल्याने पदे व अनुदान अनुज्ञेय नसल्याने तो ई-लर्निंगच्या सुविधेव्दारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिल्यास त्याचा त्यांना स्वयं अभ्यास करण्यासाठी उपयोग होईल. हे विचारात घेवून विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे ई-लर्निंग अभ्यासक्रम तयार करण्यासाठी लायकॉज टेक्नॉलॉजीज प्रा. लि. या नवी मुंबईस्थित कंपनीने तज्ञांचा गट स्थापन करुन त्यांचेकडून अभ्यासक्रम तयार करुन घेतला आहे.

ई-लर्निंग च्या माध्यमातुन सदर अभ्यासक्रम राबविण्याचे फायदे खालीलप्रमाणे आहेत :-

१) महाविद्यालयांना हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी लागणारा प्रशासकीय /शैक्षणिक वेळ व खर्च वाचेल
२) सर्व विद्यार्थ्यांना सारख्याच दर्जाचा अभ्यासक्रम उपलब्ध असेल
३) सदरील अभ्यासक्रमात पर्यावरण, प्रदुषण व सुजाण नागरिकत्व हा मुख्य गाभा असल्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती निर्माण होईल.
४) अभ्यासक्रम सीडी / ऑनलाईन स्वरुपात असल्यामुळे गो-ग्रीन या पर्यावरण तत्वाचा अवलंब होईल.

विद्यार्थ्यांना ई-लर्निंग सीडीव्दारे अध्यायनाची सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे त्यांना हा विषय प्रचलित पध्दतीने शिकविण्याची गरज राहणार नाही. तसेच विद्यापीठ / महाविद्यालयांना कोणत्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध कराव्या लागणार नाहीत. हा अभ्यासक्रम ई-लर्निंग सीडीव्दारे राबविल्यामुळे पर्यावरण जागृतीला हातभार लागेल हे विचारात घेवून सदर अभ्यासक्रम सेल्फ लर्निंग सीडीव्दारे व ऑन लाईन पध्दतीने राज्यातील ५ शासकीय महाविद्यालयामध्ये प्रायोगिक तत्वावर शैक्षणिक वर्ष २००९-१० करिता विद्यार्थ्यांना

उपलब्ध करुन देण्यात आला. प्रायोगिक तत्वावर ही सुविधा लायकॉन टेक्नॉलॉजीज प्रा.लि. यांना देण्याचे कारण म्हणजे या अभ्यासक्रमाला संस्था / महाविद्यालय यांचा व त्यातील विद्यार्थ्यांचा कसा प्रतिसाद मिळतो, त्याची उपयुक्तता सिध्द होते का हे पहाणे अपेक्षित होते. त्याप्रमाणे संचालकांनी ज्या ५ शासकीय महाविद्यालयामध्ये ही सुविधा उपलब्ध करुन दिली व या व्यतिरिक्त संस्थेने राज्यातील ज्या महाविद्यालये / संस्थामधील विद्यार्थ्यांना ही सुविधा उपलब्ध करुन दिली त्याचा अहवाल घेतल्यानंतर या सुविधेला विद्यार्थी व महाविद्यालये यांचेकडून चांगला प्रतिसाद असल्याचे विचारात घेवून व त्या अनुषंगाने या सुविधेची व्याप्ती वाढविण्याची आवश्यकता विचारात घेवून सन २०१०-११ मध्ये राज्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सदर सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :** लायकॉन टेक्नॉलॉजीज प्रा.लि. या कंपनी, वाशी, नवी मुंबई यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमानुसार तयार केलेला पर्यावरणशास्त्र या विषयाचा अभ्यासक्रम तयार करुन तो सन २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिल्यानंतर त्याची संचालक, उच्च शिक्षण यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सिध्द झालेली उपयुक्तता विचारात घेवून सन २०१०-११ मध्ये राज्यातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विना अनुदानित , पारंपारिक , व्यावसायिक व अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संचालक, उच्च शिक्षण व अकृषि विद्यापीठे यांचे माध्यमातून ई-लर्निंग सुविधेद्वारे प्रती वर्ष प्रती विद्यार्थी रु. २००/- इतके शुल्क आकारुन सुविधा देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सन २००९-१० मध्ये प्रायोगिक तत्वावर ही मान्यता लायकॉन टेक्नॉलॉजीज प्रा.लि. यांना दिल्यानंतर सन २०१०-११ मध्ये ही सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी रितसर निविदा प्रक्रिया करणे आवश्यक होते. तथापि काही महाविद्यालयांमध्ये आता विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले असल्यामुळे व काही महाविद्यालयांमध्ये प्रवेशाची प्रक्रिया सुरु असल्याने रितसर निविदा प्रक्रिया करायची झाल्यास त्यामध्ये या क्षेत्रात काम करणाऱ्या व निविदा प्रक्रियेत सहभाग घेण्यास इच्छुक असणाऱ्या संस्थांकडे हा अभ्यासक्रम तयार असायला हवा अशा सर्व संस्थांनी तयार केलेले अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार आहेत किंवा नाहीत हे तपासल्यानंतरच त्यांची निविदेसाठी पात्रता ठरणार असल्याने व तद्नंतर पुढील निविदेची अंतिम प्रक्रिया करावी लागणार असल्याने या कामातील अभ्यासक्रम तपासणीसाठी तज्ञ गट स्थापन करणे त्या गटाने, संस्थांनी तयार केलेले अभ्यासक्रम तपासणे त्यामध्ये ज्या काही त्रुटी / जास्तीच्या बाबी असतील (deviation / variation) त्यासह त्यांची निविदेसाठी पात्रता निश्चित होणार असल्याने मोठ्या प्रमाणावर वेळ वाया जाईल. परिणामी शैक्षणिक वर्षाच्या पूर्व भागात विद्यार्थ्यांना हि सुविधा उपलब्ध होणार नाही जे विद्यार्थ्यांच्या हिताचे नाही हे विचारात घेवून व मागवर्षी लायकॉन टेक्नॉलॉजीज प्रा.लि. या कंपनीने ही सुविधा पुरविल्याचा अनुभव संचालक, उच्च शिक्षण यांच्या अहवालानुसार उत्कृष्ट असल्याने निविदा प्रक्रिया न करता हे काम लायकॉन टेक्नॉलॉजीज प्रा.लि. या कंपनीस देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

अशा प्रकारची अभ्यासक्रमाची सुविधा राज्य शासनाने नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे. कारण राज्य शासनाच्या संमतीशिवाय अशा माध्यमातून अभ्यासक्रम राज्यामध्ये राबविण्यास मोकळीक दिल्यास अशाच फसवे (बोगस) अभ्यासक्रम तयार करुन ते विद्यार्थ्यांमध्ये प्रसृत करणाऱ्या संस्थांचा सुळसुळाट होईल. परिणामी योग्य दर्जाच्या अभ्यासाची सुविधा तर उपलब्ध होणार नाहीच शिवाय विद्यार्थ्यांना नाहक आर्थिक झळ

पोहोचविली जाईल. तसेच राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेकडूनच सदर ई-लर्निंगची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

२. उपरोक्तप्रमाणे हा विषय ई-लर्निंग सुविधेद्वारे शिक्षणव्यवस्थेशी सुविधा उपलब्ध करून देण्यास लायकॉस टेक्नॉलॉजीज कंपनी, वाशी, नवी मुंबई या कंपनीस शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे :-

अटी व शर्ती :-

१) सदर अभ्यासक्रम ई-लर्निंग सुविधेद्वारे राबविल्यामुळे शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक भार पडणार नाही.

२) सदर अभ्यासक्रमासाठी प्रती विद्यार्थी निर्धारित केलेल्या रु. २००/- पेक्षा अधिक शुल्काची मागणी संस्था करणार नाही. सदर शुल्क संबंधित महाविद्यालयामार्फत वसूल करून दिले जाईल.

३) सर्वसाधारण संस्थेची सेवा समाधानकारक न आढळल्यास शुल्क परत घेऊन [illegible] करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(वि. पो. चांदेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. कुलसचिव, सर्व संबंधित अकृषी विद्यापीठे
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
४. सर्व संबंधित शासकीय महाविद्यालये
५. व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, लायकॉस टेक्नॉलॉजीज कंपनी, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३,
६. निवड नस्ती